
# **पुस्तक परिचय -** "सुवर्ण किरणे" - सौ. विजया माधव चितळे

आत्मवृत्त - साकेत पब्लिकेशन, औरंगाबाद




सत्य हे **कधीकधी** कल्पनेच्याही पलिकडे असते, “Truth is stranger than Fiction” हे "सुवर्ण किरणे" हे पुस्तक वाचल्यावर पटते! ह्या पुस्तकाची लेखिका आहे - आपल्यातलीच - मराठी - सौ. विजया माधव चितळे. त्यांचे हे आत्मवृत्त आहे. आपल्याला हे माहीत आहेच की डॉ. माधव ए. चितळे, W L ह्यांना Stockholm Water Prize मिळाल्याबद्दल आपण त्यांचा सत्कार केला होता. सर सी. व्ही. रामान N L ह्यांच्या नंतर ६३ वर्षांनी, डॉ. माधव ए. चितळे ह्यांचा असा सत्कार Stockholm मध्ये झाला.

ह्या संबंधी सर्वांना माहिती व्हावी, म्हणुन पुस्तक लिहावे असा आग्रह मी त्यांना करीतच होतो. त्यांच्या पत्नी, सौ. विजया ह्यांनी, त्यांच्या लग्नाच्या ५०व्या वर्षी हे पुस्तक - आत्मवृत्त - लिहिले आहे.

प्रस्तावनेत त्या लिहितात – “....सुखाच्या अनुभवांनी माझे जीवन समृद्ध होत गेले होते व दुख:च्या आठवणींनी विव्हलही झाले होते. त्यांचे एक भले मोठे गाठोडे मनात साठत होते, त्याचा भार अशा लेखनामुळे कमी व्हायला मदत होऊ लागली.

माणुस प्रकाशाच्या साह्याने जगतो, गडद अंधारात सुध्दा मिणमिणता प्रकाश त्याला मार्गदर्शक ठरतो, धीर देतो. ह्या स्मृति किरणांनी माझी अशीच सतत सोबत केली. Stockholm - Sweden ला जलपुरस्कार घ्यायला मी माधवांबरोबर गेले, तेंव्हा तेथे अनुभवाला यावयाच्या विश्वाची अपूर्वाई माझ्या लक्षात आली ....

.... ३१ डिसेंबर २००९ ला माझ्या व माधवांच्या संसाराला ५० वर्षे पूर्ण झाली.

मग मनात आले की, आठवणींचा व अनुभवांचा हा ठेवा आपण इतरांनाही का वाटून देऊ नये - म्हणून हे संकलन आपणापुढे ठेवण्याचे हे माझे धारिष्ट्य ..."

सौ. विजया ह्या पूर्वाश्रमीच्या "आशा पटवर्धन", नागपूरच्या प्रसिध्द डॉ. मनोहर गंगाधर पटवर्धन ह्यांची कन्या. सुसंस्कृत, संपन्न कुटुंबातली एकुलती एक कन्या. अष्टपैलू, बुद्धिमान विद्यार्थिनी. BSc. ला सुवर्ण पदक, खो खो मध्ये अजिंक्य पदक, संगीत विशारद, नाटकात काम करणारी!!

डिसेम्बर ३१, १ ९ ५ ९ ला माधवांशी त्यांचे लग्न झाले. इंजिनिअर माधव चितळे हे इरीगेशन डीपार्टमेंट मध्ये होते. डॉ. चितळे हे SSC त दुसरे, जगन्नाथ शंकरशेठ, मराठी गोल्ड मेडालीस्ट, BE ला फर्स्ट, महाराष्ट्र स्टेटचे चीफ इंजिनिअर आणि सेक्रेटरी Princeton, N.J. USA ला Parveen Fellow, दिल्लीला C.W.P.C. चे “चेअरमन”. नंतर Stockholm Water Laurette, शिवाय ५ -१ /२ वर्षे रामायणावर प्रवचने! रांगोळ्या काढणे, घरच्या समारंभात काव्य करणे, भटजीचेही काम करणे असेही "माधव बुवा" हे व्यक्तिमत्व!

ह्यामुळे विवाहानंतर विजयांनाही गृहिणी म्हणून ह्या सर्वात भाग घ्यावा लागला.

--- एक निरागस, निष्पाप, पापभीरू, शांत, सद्विचारी, धार्मिक गृहिणी --- कुटुंब हेच सर्वस्व मानून त्यात जीव ओतणारी, मुलांवरही उत्तम संस्कार केले. त्यांना दोन मुली आणि एक मुलगा आहे. पटवर्धनांनकडून आलेला हा वारसा आहे.

त्या म्हणतात, "आज्जी, आई, वडील ह्या आधारवडांनी माझे आयुष्य संपन्न केले, सुसंस्कृत केले. माधावांसारख्या पतीची पत्नि होण्यालायक केले. -- आज त्यांचे स्मरण झाले तरी मी नतमस्तक होते.”

माधवांबरोबरचा अनुभव त्यांनी ह्या पुस्तकात लिहिला आहे तो सर्वांनी स्वतः वाचला पाहिजे.

धरणांवर कामाचे ठिकाणी वास्तव्य, साप, विंचू, कोयना धरणीकंप, पानशेत पूर यांच्याशी जीवघेणे प्रसंग, अनेक चित्तथरारक अनुभव, अतर्क्य घटना : "मुलाला पळवून नेऊ", "विजयाने जळत्या गाडीतून उडी मारली" अशा बातम्या! अंगावर काटा उभा राहील अशी वर्णने; त्यांच्या भोवती संरक्षक कडे- मशीनगन्स घेऊन सैनिक भोवती, विमानातही पिस्तोल घेऊन गुप्त पोलिस शेजारी, संरक्षक म्हणून –

काळजाला घरे पाडणारी, दुःख्खाश्रूपूर्ण घटना - इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये शिकत असलेल्या हुषार मुलीचा मेंदूतील रक्तस्त्रावाने अचानक मृत्यू-

ह्या उलट ध्यानी, मनी, स्वप्नी नसलेल्या Stockholm Water Prize मिळाल्याचा स्वीडनहून आलेला अचानक फोन - दिल्लीत बसून स्वीडिश नभोवाणीवरून जगभर प्रसारित झालेली तासभर मुलाखत - स्टोकहोमच्या सुवर्णमहालात राजाराणी बरोबर जेवण. माधव बक्षीस घ्यायला उठले तेंव्हा स्वप्नात तर नाहीना असे साश्रू नयनांना वाटले. तेथे ८ दिवस भारताचा तिरंगी झेंडा "Grand Hotel" वर झळकणे , Stockholmच्या गव्हर्नरांनी व त्यांच्या सहकार्यांनी उजाडता - उजाडता, सकाळी पुष्पगुच्छ आणि केक आणून, Happy Birthday म्हणून, गाणी म्हणून वाढदिवसानिमित्तही अभिनंदन करणे - पहिला भारतीय - पहिला मराठी नागरीक ज्याला Water Laurette ही पदवी मिळाली त्या माधवांबरोबर विजयाने जगभर प्रवास केला.

जागतिक मराठी - परिषदेत दिल्लीला राष्ट्रपतींनी त्यांचा सत्कार केला. निरनिराळ्या जागतिक परिषदांमध्ये भाषणे दिली. विजयांना जगभर मैत्रिणी लाभल्या. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, जपान, चीन, भूतान, नेपाळ, कोस्टारिका, इजिप्त, इत्यादी.

असा हा मनोज्ञ जीवन प्रवास, त्यावर प्रकाश टाकणारी ही, "सुवर्ण किरणे." आपणा सर्वांना अभिमान वाटावा असे हे कुटुंब.

ह्या पुस्तकाची सुरवात झाली ती अशी: "मी आशा पटवर्धन --- आणि शेवट असा की, "---- असा आमचा चितळे परिवार --- एकजिनसी आणि उत्साहाने व आनंदाने थबथबणारा. सुवर्ण किरणांनी आमचा सर्व परिवार उजळून टाकला आहे. आई-आप्पांच्या दीर्घायुष्यामुळे, वारंवार निमित्ता-निमित्ताने सर्व परिवार एकत्र येत असे, तेंव्हा सर्वांच्या हास्यकल्लोळांनी घर दणाणून जाई. सप्तपदीत मी माधवांचा आश्वासक हात हातात घेऊन त्यांच्या दमदार पावलांवर पावले टाकत त्यांच्याबरोबर चालले . त्याचवेळी आपले कौटुंबिक आणि सामाजिक जीवन कसे असावे, या बाबत माधवांचा विचार पक्का होता. आज ते सारे प्रत्यक्षात अनुभवल्याचा आनंद मी मनात साठवून आहे. लग्नानंतर सुरवातीच्या काळात अनभिज्ञ अशा मला सांभाळून घेत संसारात रूळविले. चितळे परिवारात मला मिसळून टाकले. कुठल्याही सुख-दु:ख्खा , आनंदाच्या किंवा कठीण चढणीच्या प्रवासात अविचल राहून मला स्थिर करते झाले. अशा ह्या सहचराबारोबरची , माझी लग्नानंतरची ५० वर्षे आमच्या चितळे परिवाराच्या सोबतीने कुठे सरली ते मला कळलेच नाही –"

दोन्ही घरांना जोडणारा पूल - इकडची माहेरची 'राणी' आणि सासरचीही 'राणी' - अशी ही दोन 'राज्यांना' एकत्र आणून हवी हवीशी वाटणारी "सम्राज्ञी" - महाराणी!!

माझ्या मते, प्रत्येक व्यक्तीचे आयुष्य हे एक स्वतंत्र कादंबरीमय असते. तेंव्हा आपणही आपले आत्मवृत्त लिहावे असे मला आग्रहाने म्हणावेसे वाटते.

सुवर्ण किरणे जरूर वाचा. ह्या पुस्तकात साहित्यिक, सामाजिक, राजकीय, भौगोलिक, निसर्ग वर्णने, धार्मिक, कौटुंबिक सर्व प्रकारची वर्णने, चिंतने आहेत. काव्य-शास्त्र, विनोदही आहेत. उदात्तीकरणही आहे- मिस्किलपणाही आहे. रसिकांची मने हेलावून टाकून आनंदाश्रू तसेच दु:खाश्रू काढण्याचे सामर्थ्य असलेले "क्लासिक लिटरेचर" मधे जमा होणारे हे पुस्तक आहे. तरीसुध्दा सौ. विजया म्हणतात, "मी काही लेखिका-साहित्यिक नाही ... वगैरे."

मी एवढेच म्हणेन की, इतके उत्कृष्ट क्लासिक पुस्तक लिहिणारी: "विजया विनयेन शोभते".

धन्यवाद!

**प्रभाकर वि. बोपर्डीकर**

**दि. १५ जून २०१३**

(पूर्वप्रसिध्दी : 'स्नेहदीप', जुलै २०१३)